**<u>ठळक बातम्या</u>**

- नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणा हा २१ शतकातला सर्वात मोठा निर्णय असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, या सुधारणांना पाठिंबा देण्याचं सर्वांना आवाहन

- काँग्रेसचा आक्षेप महिला आरक्षणाला नसून मतदारसंघ पुनर्रचना प्रस्तावाला आणि तो सादर करण्याच्या वेळेला असल्याचं काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचं स्पष्टीकरण

- महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये झालेल्या दोन रस्ते अपघातात १६ जणांचा मृत्यू

आणि

- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या अंत्यदर्शनासाठी चाहत्यांची रीघ

**<><><><><>**

नारी शक्ती वंदन अधिनियमात सुधारणा करुन २१ व्या शतकातला सर्वात मोठा निर्णय भारत घेणार आहे. त्यासाठी सर्वांनी पाठिंबा द्यावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आयोजित नारी शक्ती वंदन संमेलनात ते बोलत होते.  महिलांच्या सहभागाने देशातली लोकशाही बळकट होत असल्यानं या आरक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली. राष्ट्रपतींपासून प्रधानमंत्री पद भूषवताना या देशात महिलांनी स्वतःची अमीट छाप उमटवली असल्याचंही ते म्हणाले. १६ ते १८ एप्रिलच्या दरम्यान संसदेत नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांवर चर्चा होणार आहे आणि याद्वारे लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण दिलं जाणार आहे, असं ते म्हणाले. गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणात महिलांना आरक्षण देण्याचा मुद्दा चर्चिला जात होता आणि सर्वच राजकीय पक्षांनी या दिशेने प्रयत्न केल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. २०२३ मध्ये या अधिनियमाला मंजुरी दिली तेव्हा सर्वच राजकीय पक्षांनी याला पाठिंबा दिला होता याची आठवण त्यांनी यावेळी केली.

**- - होल्ड प्रधानमंत्री बाइट - - -**

२०२९ च्या निवडणुकांपासून या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी विरोधी पक्षांसह सर्वांनी केली. त्या दिशेनं सरकारनं प्रयत्न सुरू केले होते आणि विविध

घटनातज्ञांशीही चर्चा सुरू होती, असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. हे विधेयक महिला सशक्तीकरण आणि लोकशाहीतला त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी असल्याचं केंद्रीय महिला आणि बाल कल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी सांगितलं. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी यावेळी 9667173333 हा टोल फ्री क्रमांक जाहीर केला. केंद्र सरकारच्या निर्णयाला पाठिंबा देऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी या क्रमांकावर मिस कॉल द्यावा असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षणापेक्षाही मतदारसंघांची फेररचना हा अधिक गंभीर मुद्दा असल्याचं काँग्रेस विधीमंडळ पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी म्हटलं आहे. फेररचना विषयक प्रस्ताव अत्यंत धोकादायक आणि संविधानातल्या तरतुदींचं हनन करणारा असल्याची टीका त्यांनी वृत्तपत्रात लेख लिहून केली आहे.

लोकसभा आणि विधानसभांमधे महिला सदस्यांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठीचं विधेयक नारी शक्ती वंदन अधिनियम, २०२३ मधेच मंजूर झालं. २०२४ पासूनच या सुधारणा लागू करण्याची मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली होती. पण सरकारनं ती फेटाळून लावली याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली. आगामी जनगणना आणि जनगणनेवर आधारित मतदारसंघ फेररचना झाल्यावरच नवीन सुधारणा लागू झाल्या पाहिजेत अशी विरोधकांची मागणी असल्याचं गांधी यांनी नमूद केलं.

जातनिहाय जनगणना करण्यासाठी टाळाटाळ करायची हाच केंद्र सरकारचा खरा हेतू असल्याचा आरोप सोनिया गांधी यांनी केला आहे. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमधे विधानसभा निवडणुका ऐन भरात असताना महिला आरक्षण विधेयकावरुन विरोधकांवर दबाव आणण्याचा हा प्रयत्न असल्याचं त्यांनी या लेखात लिहिलं आहे.

**<><><><><>**

नोकरीच्या बदल्यात जमीन घोटाळ्यात सीबीआयने राजद प्रमुख लालू प्रसाद यादव आणि त्यांच्या कुटुंबियांविरुद्ध दाखल केलेला एफआयआर रद्द करायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. मात्र लालू प्रसाद यादव यांना सुनावणीला व्यक्तिशः हजर राहण्यातून सूट दिली आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७ ए नुसार

आपल्याविरुद्ध एफ आय आर दाखल करण्यापूर्वी आवश्यक मंजुरी घेतली नव्हती असं लालूप्रसाद यादव यांचं म्हणणं आहे. त्यावर युक्तिवाद करावा असं न्यायमूर्ती एम एम सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंग यांच्या पीठानं सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यात मुरबाडजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला आणि १ जण गंभीर जखमी झाले आहेत. सिमेंटर मिक्सरने समोरुन येणाऱ्या वाहनाला धडक दिल्यानं हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

<><><><><>

गुजरातमधल्या सुरेंद्रनगर जिल्ह्यात मध्यरात्री पायी प्रवास करणाऱ्या भाविकांना भरधाव ट्रकनं चिरडल्यामुळे झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. मृतांमध्ये ४ महिलांचा समावेश आहे. यात्रेकरूंचा हा गट राजकोटहून बहुचराजी या इथं चालला होता.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या कांकेर जिल्ह्यातल्या माचपल्ली भागात सुरक्षादल आणि माओवाद्यांच्यात आज झालेल्या चकमकीत ‘रूपी’ ही महिला कमांडर ठार झाली. तिच्याकडून एक स्वयंचलित हत्यारही जप्त करण्यात आलं. या महिला कमांडरनं आत्मसमर्पण करावं म्हणून पोलीस बऱ्याच काळापासून प्रयत्न करत होते.

<><><><><>

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेण्यासाठी चित्रपट क्षेत्रातले सेलिब्रिटी, राजकीय नेते तसंच सर्वसामान्य नागरिक यांची सकाळपासून गर्दी झाली आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख, अभिनेत्री तबू, संगीतकार ए आर रेहमान, गायिका अनुराधा पौडवाल, गायक सुदेश भोसले, क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी आशा भोसले यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं. दुपारी तीन वाजेपर्यंत मुंबईतल्या लोअर परळ इथल्या त्यांचा निवासस्थानी पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवलं जाणार आहे. चार वाजता दादर इथल्या शिवाजी पार्क स्मशानभूमीत पार्थिवावर अंत्यसंस्कार केले

जातील. त्याचं निवासस्थान आणि शिवाजी पार्क परिसरात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. अनेक ठिकाणी आशा भोसले यांना आदरांजली वाहणारे बॅनर्स लावण्यात आले असून त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होते आहे.

**<><><><><>**

इराणमधल्या बंदरांची नाकेबंदी आजपासून करण्याची घोषणा अमेरिकन लष्करानं केली आहे. इराणच्या स्थानिक प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी साडेपाच वाजता या कारवाईला प्रारंभ होईल. अशा प्रकारच्या कोणत्याही कारवाईचा प्रतिकार केला जाईल असा इशारा इराणने दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाहतूक रोखण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानंतर तिथली वाहतूक पूर्णपणे थांबली होती. तथापि इराणमधल्या बंदरात न जाणाऱ्या जहाजांना या मार्गातून जाता येईल, असं सेंटकॉम म्हणजे अमेरिकन सैन्यदलानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमधे आज हैद्राबादच्या राजीव गांधी स्टेडीयमवर सनरायझर्स हैद्राबाद आणि राजस्थान रॉयल्स यांचा सामना होणार आहे. सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

**//<><><><><>//**